सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

विधि व न्याय विभाग

सन १९५७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २

# महाराष्ट्र शेटगी वतन हक्क (रत्नागिरीचे) रद्द करण्याबाबत अधिनियम

(दिनांक २६ जानेवारी, २०१६ पर्यंत सुधारलेला)

**MAHARASHTRA ACT No. II OF 1957**

# The Maharashtra Shetgi Watan Rights (Ratnagiri) Abolition Act

*(As modified upto the 26th January, 2016)*

व्यवस्थापक , येरवडा कारागृह मुद्रणालय, पुणे-४११ ००६ यांच्याद्वारे भारतात मुद्रित आणि संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई-४०० ००४ यांच्याद्वारे प्रकाशित

२०१५

[ किंमत : १४ रुपये ]

वि (जे) ६६८

# महाराष्ट्र शेटगी वतन हक्क (रत्नागिरीचे) रद्द करण्याबाबत अधिनियम, १९५७

## अनुक्रमणिका

**उद्देशिका**


| कलमे | | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १. | लघुसंज्ञा व्याप्ती व प्रारंभ. | ... | १ |
| २. | व्याख्या. | ... | १ |
| ३. | शेटगी वतने रद्द करणे. | ... | २ |
| ४. | नुकसानभरपाईचे प्रमाण. | ... | २ |
| ५. | नुकसानभरपाई देण्याची रीत. | ... | २ |
| ६. | अपील. | ... | २ |
| ७. | महसूल न्यायाधिकरणापुढील कामकाजाची रीत. | ... | ३ |
| ८. | न्यायालय शुल्क. | ... | ३ |
| ९. | निवाड्याचे व महसूल न्यायाधिकरणाच्या निकालांचे निर्णयकत्व. | ... | ३ |
| १०. | नियम. | ... | ३ |




वि (जे) ६६८--१

## सन १९५७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २[१]

## [ महाराष्ट्र शेटगी वतन हक्क (रत्नागिरीचे) रद्द करण्याबाबत अधिनियम ]

**[ ९ जानेवारी १९५७ ]**

[ या अधिनियमाला राष्ट्रपती यांची अनुमती दिनांक २९ डिसेंबर, १९५६ रोजी मिळाल्यानंतर तो महाराष्ट्र **शासन राजपत्र,** भाग चार, असाधारण, यामध्ये दिनांक ९ जानेवारी १९५७ रोजी प्रथम प्रसिद्ध करण्यात आला ]

## सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक २४ (२२-८-२०१२)*

## मुंबई राज्याच्या रत्नागिरी जिल्ह्यांतील शेटगी वतने रद्द करण्याबाबत अधिनियम

**ज्याअर्थी,** रत्नागिरी जिल्ह्यातील राजापूर शहरातील शेटगी वतने रद्द करणे आणि त्यास परिणामभूत व अनुषंगिक असलेल्या बाबींची तरतूद करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी** भारतीय गणराज्याच्या सातव्या वर्षी यावरून पुढे लिहिल्याप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे.--

**लघुसंज्ञा व्याप्ति व प्रारंभ.**

**१.** (१) या अधिनियमास [२][महाराष्ट्र शेटगी वतन हक्क (रत्नागिरीचे) रद्द करण्याबाबत अधिनियम] असे म्हणावे.

(२) तो मुंबई राज्यातील रत्नागिरी जिल्ह्यास लागू आहे.

(३) [३][तो, राज्य सरकार राजपत्रात अधिसूचना प्रसिद्ध करून नेमील त्या तारखेस अंमलात येईल].

**व्याख्या**

**२.** या अधिनियमात, संदर्भावरून इतर रीतीने आवश्यक असेल ते खेरीजकरून.--

(अ) "विहित केलेले" या संज्ञेचा अर्थ, या अधिनियमान्वये केलेल्या नियमांवरून विहित केलेले, असा समजावा ;

(ब) "शेटगी वतन" या संज्ञेचा अर्थ, सर्वसाधारणपणे शेटगी वतन किंवा शेतकी वतन म्हणून ओळखण्यात येणारे वतन असा समजावा, व त्यात कोणतीही रूढी, रिवाज, अनुदान, सनद, ताकीद किवा इतर मालकीहक्क या अन्वयेच्या पुढील गोष्टींचा समावेश होतो.--

(१) रत्नागिरी जिल्ह्याच्या राजापूर तालुक्यातील राजापूर शहराच्या बाजारात (पेठेत) खुष्कीच्या मार्गाने आयात होणाऱ्या सर्व व्यापारी मालाचे वजन करण्याचा किंवा तो मोजण्याचा अग्रहक्क, आणि.

---

[१] उद्देश व कारणे यांच्या निवेदनासाठी, मुंबई शासन राजपत्र, १९५०, भाग पाच, पृष्ठे ८८२ पहा.

[२] सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक २४ च्या अनुसूचीतील नोंद ६३ द्वारे "मुंबई शेटगी वतन हक्क (रत्नागिरीचे) रद्द करण्याबाबत अधिनियम, १९५६" या मजकुराऐवजी संक्षिप्त नावाची सुधारणा करण्यात आणि दिनांक १ मे १९६० पासून.

[३] १ एप्रिल १९५७, शासन निर्णय, महसूल विभाग, क्रमांक डब्ल्युटीएन/५६, दिनांक ५ जानेवारी १९५७ पहा.

* अधिनियमाच्या प्रारंभाचा दिनांक दर्शवितो.

(२) त्याच्या संबंधांत शेटगी वतनाची मिळकत वसूल करण्याचा हक्क ;

(क) "शेटगी वतनाची मिळकत" या संज्ञेचा अर्थ, लाभ किंवा सलाई यांच्या रूपाने किंवा इतर कोणत्याही नावाने ओळखण्यात येणारी आणि शेटगी वतनाचा बोजा म्हणून मालाच्या रूपाने किंवा इतर रीतीने आकारण्याजोगी फी, असा समजावा ;

(ड) "शेट्ये वतनदार" या संज्ञेचा अर्थ, शेटगी वतन किंवा त्याचा कोणताही भाग धारण करणारा, असा समजावा.

**शेटगी वतने रद्द करणे.**

**३.** कोणतीही रूढी, रिवाज, अनुदान, सनद किंवा न्यायालयाची कोणतीही आज्ञप्ति किंवा आदेश असला तथापि,

(अ) त्यांचे किंवा त्यासंबंधीचे सर्व बोजे धरून सर्व शेटगी वतने रद्द केली पाहिजेत व या अन्वये रद्द करण्यात येत आहेत, आणि ;

(ब) कोणत्याही शेटगी वतनाच्या मिळकतीसंबंधीचे शेट्ये वतनदारांचे सर्व हक्क नष्ट करण्यात आले आहेत असे समजले पाहिजे.

**नुकसान-भरपाईचे प्रमाण.**

**४.** शेट्ये वतनदार ह्यास, कलम ३ मुळे त्याचे कोणतेही हक्क रद्द झाल्याबद्दल किंवा नष्ट झाल्याबद्दल, ह्या अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वीच्या तीन वर्षात त्याने वसूल केलेल्या शेटगी वतनाच्या मिळकतीच्या किंमतीच्या सरासरीच्या तीन पटीइतक्या दराने नुकसानभरपाई मिळण्याचा हक्क असेल.

**नुकसानभरपाई देण्याची रीत.**

**५.** (१) कलम (४) अन्वये नुकसानभरपाई मिळण्याचा हक्क असलेल्या कोणत्याही शेट्ये वतनदारास, या अधिनियमाच्या प्रारंभापासून सहा महिन्यांच्या आत, उक्त कलमान्वये त्यास देण्याजोगी नुकसानभरपाईची रक्कम ठरविण्याकरिता विहित केलेली माहिती जोडलेला, विहित केलेल्या नमुन्यांतील अर्ज कलेक्टरकडे करण्याचा अधिकार आहे.

(२) असा अर्ज मिळाल्यावर कलेक्टरने, सन १८७९ च्या मुंबई जमीन महसूल संहितेच्या १२ व्या बाबींत तरतूद केलेल्या रीतीने रीतसर चौकशी केल्यानंतर, नुकसानभरपाईची रक्कम ठरविणारा निवाडा केला पाहिजे. **१८७९ चा मुंबई ५.**

**अपील**

**६.** उक्त अधिनियमांत कोणताही मजकूर असला तरीही, कलेक्टरच्या निवाड्यामुळे नुकसानी पोहोचलेल्या कोणत्याही इसमास, सन १९३९ चा मुंबई महसूल न्यायाधिकरणाबाबत अधिनियम या अन्वये रचना करण्यांत आलेल्या मुंबई महसूल न्यायाधिकरणाकडे अशा निवाड्याच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत अपील करण्याचा अधिकार आहे. सन १९०८ चा भारताचा मुदतीचा अधिनियम याची कलमे ४, ५, १२, व १४ यांचे उपबंध अशी अपिले दाखल करण्यास, लागू होतील. **१९३९ चा मुंबई १२.** **१९०८ चा मुंबई ९.**

**७.** (१) मुंबई महसूल न्यायाधिकरणाने, अपील करणारास व राज्य सरकारास नोटीस दिल्यानंतर, अपिलाचा निर्णय केला पाहिजे व आपला निर्णय नमूद करून ठेवला पाहिजे. **महसूल न्यायाधि- करणापुढील कामकाजाची रीत**

**१९०८ चा मुंबई ५.** (२) ह्या अधिनियमान्वयेच्या अपिलाचा निर्णय करताना मुंबई महसूल न्यायाधिकरणाला, न्यायालयाचे सर्व अधिकार असतील व त्यास ते चालविण्याचा अधिकार आहे, आणि सन १९०८ ची दिवाणी काम चालविण्याच्या रीतीविषयी संहिता ही अन्वये मूळ न्यायालयाच्या आज्ञप्तिवरील किंवा आदेशावरील अपिलांचा निर्णय करताना न्यायालय जी कार्यरीती अनुसरते तीच कार्यरीती न्यायाधिकरणाने अनुसरली पाहिजे.

**१८७० चा मुंबई ७.** **८.** सन १८७० चा न्यायालय शुल्क अधिनियम यांत कोणताही मजकूर असला तरीही, या अधिनियमान्वये मुंबई महसूल न्यायाधिकरणाकडे केलेल्या प्रत्येक अपिलावर विहित करण्यात येईल इतक्या किंमतीचा न्यायालय शुल्क मुद्रांक लावला पाहिजे. **न्यायालय शुल्क**

**९.** मुंबई महसूल न्यायाधिकरणाकडे करावयाच्या अपिलास पात्र ठेवून, कलेक्टरने दिलेला निवाडा, आणि मुंबई महसूल न्यायाधिकरणाने अपिलावर दिलेला निकाल अखेरचा व निर्णायक असेल व कोणत्याही न्यायालयांतील कोणत्याही दाव्यात अथवा कामकाजांत त्याविरुद्ध हरकत घेता येणार नाही. **निवाड्याचे व महसूल न्यायाधिकरणाच्या निकालाचे निर्णयकत्व.**

**१०.** राज्य सरकारास, या अधिनियमांचे उपबंध पार पाडण्याच्या कारणांकरिता नियम करण्याचा अधिकार आहे. असे नियम आगाऊ प्रसिद्ध केले पाहिजेत. **नियम**

---

येरवडा कारागृह मुद्रणालय, पुणे - ६

# महाराष्ट्र शासनाची प्रकाशने मिळण्याची ठिकाणे

- **संचालक**
  शासन मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशन संचालनालय,
  महाराष्ट्र राज्य,
  नेताजी सुभाष मार्ग, मुंबई-४०० ००४.
  दूरध्वनी : ०२२-२३६३०६९५
  ०२२-२३६३४०४९

- **व्यवस्थापक**
  शासकीय फोटोझिंको मुद्रणालय व ग्रंथागार,
  फोटोझिंको मुद्रणालय आवार, जी. पी. ओ. नजीक.
  पुणे-४११ ००१.
  दूरध्वनी : ०२०-२६१२५८०८
  ०२०-२६१२४७५९

- **व्यवस्थापक**
  शासकीय मुद्रणालय व ग्रंथागार,
  सिव्हील लाईन्स, नागपूर-४४० ००१.
  दूरध्वनी : ०७१२-२५६२६१५

- **सहायक संचालक**
  शासकीय लेखनसामग्री भांडार व ग्रंथागार
  शहागंज, गांधी चौकाजवळ,
  औरंगाबाद-४३१ ००१.
  दूरध्वनी : ०२४०-२३४३३९६
  ०२४०-२३३१४६८

- **व्यवस्थापक**
  शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार,
  ताराबाई पार्क, कोल्हापूर-४१६ ००३.
  दूरध्वनी : ०२३१-२६५०४०२

## महाराष्ट्र शासनाच्या प्रकाशनाचे अधिकृत विक्रेते